महासत्ता

# डॉ.रजनीश कामत यांची निवड प्रेरणादायक-डॉ.शिर्के

कोल्हापूर,ता.४(प्रतिनिधी)-

डॉ.रजनीश कामत यांची डॉ.होमी भाभा राज्य विद्यापिठाच्या कुलगुरू पदी झालेली निवड ही आनंदाची, अभिमानाची आणि प्रेरणादायक गोष्ट आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापिठाचे कुलगुरू, डॉ.दिगंबर शिर्के यांनी केले.

कुलगुरू डॉ.कामत यांची डॉ.होमी भाभा राज्य विद्यापिठ, मुंबई येथे कुलगुरू पदी निवड झाल्याबद्दल शिवाजी विद्यापिठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये आयोजित सत्कार समारंभामध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शिर्के अध्यक्षस्थानावरून बोलत होते.यावेळी विद्यापिठाचे प्र-कुलगुरू डॉ.प्रमोद पाटील, डॉ.होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबईचे कुलगुरू डॉ.रजनीश कामत, डॉ.पी.जे.कसबे, डॉ.एम.के.भानारकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रभारी कुलसचिव डॉ.विलास शिंदे यांनी आभार मानले.

तरुण भारत

# प्रभारी कुलसचिव डॉ. शिंदे यांना प्रा. मो. वा. चिपळोणकर पुरस्कार

कोल्हापूर : इंडियन फिजिक्स असोसिएशनच्या पुणे विभागाच्यावतीने मराठीतून विज्ञान प्रसारासाठी देण्यात येणारा यंदाचा प्रतिष्ठेचा प्रा. मो. वा. चिपळोणकर



पुरस्कार–शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव, विज्ञान साहित्यिक डॉ. व्ही. एन. शिंदे यांना जाहीर झाला आहे. सोमवार, ५ रोजी दुपारी ४ वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागामध्ये ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या हस्ते डॉ. शिंदे यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती इंडियन फिजिक्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संजय ढोले, सचिव डॉ. विकास मठे यांनी दिली. डॉ. विलास शिंदे यांनी विज्ञान साहित्य, कार्यशाळा आणि ललित लेखनाद्वारे केलेले विज्ञानप्रसाराचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे. त्यामुळे त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. यापूर्वी हा पुरस्कार डॉ. जयंत नारळीकर, निरंजन घाटे, सुबोध जावडेकर, डॉ. पंडित विद्यासागर, डॉ. अनिल लचके, डॉ. सुनील विभुते यांना मिळाला आहे. डॉ. शिंदे यांची एककांचे मानकरी, असे घडले भारतीय शास्त्रज्ञ, हिरव्या बोटांचे किमयागार आणि आवर्तसारणी व मूलद्रव्यांची दुनिया ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. पुरस्काराबद्दल कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी डॉ. शिंदे यांचे अभिनंदन केले.